## शेतकऱ्यांनो, रस्त्यावर आल्याशिवाय दारिद्र्यातून सुटका नाही -

### आत्मबलिदान करणाऱ्या 'त्या' कोरियन शेतकऱ्याचे मनोगत ब्रम्हांडाचाही थरकाप उडविणारे

नागपूर - विदर्भात शेतकरी कर्जबाजारीपणातून आत्महत्या करीत आहेत. ज्या देशात बळीराजावर आत्महत्या करण्याची पाळी आली, त्या देशाचे भविष्य सांगण्यास ज्योतिष्याची गरज नाही. ते सारे व्यवस्थेचे बळी आहेत. जगात सर्वत्र शेतकऱ्यांची स्थिती कमी-अधिक प्रमाणात सारखीच आहे असे विदर्भापासून व्हिएतनामपर्यंत तपासले तर दिसून येईल. यात अपवाद जपान आहे. जपानमध्ये सरकारने अत्यंत जागरूकतेने शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण केले. अन्याय दिसला तेथे हस्तक्षेप केला. इतरत्र कुठेच हा भाग मात्र दिसला नाही. या भागात शेतकऱ्यांच्या संघटना आकारास आल्या नाहीत असा भागच नाही, पण या संघटनांनी तग धरला नाही. त्या एक तर मोडीत निघाल्या किंवा त्यांची अवस्था आमच्या शेतकरी संघटनेसारखी तरी झाली. व्यापार संघटनेने शेतकऱ्यांचा विचार कधी केला नाही. या व्यापार संघ्टनेने विश्वव्यापी शेतकऱ्यांचा जीव कसा गुदमरेल हेच धोरण आखले. अन्यायाचे मूळ हे संघटन असल्यामुळे दक्षिण कोरियाच्या एका शेतकऱ्याने मार्च २००३ मध्ये जिनेव्हा येथे उपोषण केले. विश्व व्यापार संघटनेच्या कार्यकर्त्यांनी त्याच्या उपोषणाकडे लक्षच दिले नाही. जगातील तमाम शेतकऱ्यांच्या पाठीमागे धावत सुटणाऱ्या विश्व व्यापार संघटना नावाच्या भस्मासुराला आवरण्यासाठी कुणी तयारच नसल्याचे दिसून येताच भ्रमनिरास झालेल्या दक्षिण कोरियाच्या त्या शेतकऱ्याने स्प्टेंबर २०३३ मध्ये कानकून येथे विश्व व्यापार संघटनेच्या विरोधात निदर्शने करीत अन्यायाच्या निषेधार्थ स्वत:च्या पोटात सुरा भोसकून आत्मबलिदान केले. या आत्मबलिदान करणाऱ्या शेतकऱ्याचे नाव आहे- क्यूयेंग ही ली. आत्महत्या करण्यापूर्वी त्याच्या मनाची काय कालवाकालव झाली असेल? त्याचे मनोगत काय असेल? यासाठी त्याने एक निवेदन जारी केले. ते त्याचे मनोगत इंग्रजीमधून मराठीत भाषांतरित करण्याचे काम शेतकरी संघटना पाईक विजय जावंधिया यांनी केले.

क्यूयेंग ही ली हा कोरियन शेतकरी सांगतो - साउथ कोरियाचा मी ५६ वर्षांचा शेतकरी आहे. साउथ कोरियाच्या शेतकऱ्यांनी संघटना स्थापन करुन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याचा माझा प्रयत्न असफल ठरला आहे. जगातील अनेक देशांतील शेतकरी नेत्यांचा हाच अनुभव आहे. विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेसंबंधातील उरुग्वे वार्ता समाप्त होताच कोरियाच्या शेतकऱ्यांच्या लक्षात येऊ लागले की आपले आर्थिक हित आपल्या हातात नाही. शेकडो वर्षांचे आमचे ग्रामीण जीवन उध्वस्त होत असताना आम्ही हतबलपणे पाहात होतो. या उध्वस्त धोरणाच्या पाठीमागे कोण आहे याचा अभ्यास करण्याचा फार जिकीरीने व हिमतीने मी प्रयत्न केला. आज जिनेव्हा येथील विश्व व्यापार संघटनेच्या कार्यालयासमोर मी इतके दिवस माझ्या मनात दाबून ठेवलेला आक्रोश व्यक्त करीत आहे.

१. कुणासाठी तुम्ही चर्चा करीत आहात? लोकांसाठी की स्वत:च्या स्वार्थासाठी?

२. राजकीय सोयीने परिपूर्ण दिशाभूल करणारे धोरण ठरविणाऱ्या विश्व व्यापार संघटनेच्या चर्चा बंद करा.

३. शेतीला विश्व व्यापार संघटनेच्या करारातून बाहेर काढा.

माझा जन्म शेतावरच झाला होता. कॉलेजमधून शेतीची पदवी (ग्रॅज्युएट) परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर मी खडकाळ जमिनीवर अंगमेहनतीने डेअरीचा विकास केला. समतल भागात वडिलोपार्जित धानाची शेती करण्यासाठी जमिनीचा एक लहान तुकडाही माझ्याजवळ आहे. इतर शेतकऱ्यांच्या मदतीने माझा आवडता शेतीचा व्यवसाय करुन मी माझ्या गावासाठी, समाजासाठी काही ना काही करण्याचा प्रयत्न करीत होतो. या मर्यादित अपेक्षेने व स्वप्नाने, आम्ही कठोर अंगमेहनत करुन सूर्योदयापासून चंद्रोदयापर्यंत राबत होतो. आम्ही नवीन तंत्रज्ञान व व्यवस्थापन शिकण्यातही कधी आळस केला नाही. आम्ही काही प्रमाणात यशस्वीही होत होतो. या यशामुळे माझा उत्साह वाढत होता व आम्ही जास्त उत्साहाने देशाच्या अन्न सुरक्षेसाठी व ग्रामीण भागाच्या विकासासाठी काम करीत होतो. (पण आता काय आहे - माझा डेअरीचा उद्योग कोसळला कारण कर्ज वाढले - भात शेतीच्या जमिनीचा तुकडा तेवढा शिल्लक आहे)

१९९५ च्या उरुग्वे चर्चेचा (विश्व व्यापार संघटनेची स्थापना) आपल्यावर होणाऱ्या गंभीर परिणामाची माहिती मिळाली तेव्हा आम्ही भीतीने कापू लागलो. आम्हाला झोपही येत नव्हती. आम्ही जिनेव्हाला येण्याचा निर्णय घेतला. आम्ही विश्व व्यापार संघटनेचे पूर्व अध्यक्ष आर्थर डंकेल यांची भेट घेतली. त्यांना आम्ही आमच्या व्यथा अत्यंत विनम्रपूर्वक सांगितल्या. त्यांनी शांतपणे ऐकून घेतले व अत्यंत मुत्सद्देगिरीने आमच्या विनंतीला नाकारण्यात आले. आमचा आवाज व शक्ती मजबूत भिंत तोडण्यात असमर्थ ठरली. निराशेने मन ग्रस्त झाले व माझ्या डोळ्यांसमोर शेकडो निदर्शने करणारे शेतकरी उभे असल्याचा भास झाला. माझ्या हातात चाकू आहे (स्वीस आर्मीचा चाकू) व मी माझे पोट कापतोय - असा भास झाला. पण मी शुद्धीवर आलो व ही भित्री व पलायनवादी कल्पना रद्द करून टाकली. पण आज मला पुन्हा तशीच निराशा करणारी विश्व व्यापार संघटनेची, शेतकऱ्यांची उपेक्षा करणारी, शेतकऱ्यांचा विश्वासघात करणारी चर्चा व निर्णय पाहून मी काय करावे? हा प्रश्न अस्वस्थ करीत आहे. कोरियामध्ये शेतकऱ्यांची काय स्थिती आहे हे मी सांगतो, बाजार व्यवस्थेत आपली कोंडी होणार आहे ही आमची भीती खरी ठरली. आम्ही कितीही कार्यक्षमतेने कार्य केले तरी आयात होणाऱ्या मालाच्या किमतीशी आम्ही स्पर्धा करु शकणार नाही हे लक्षात आले. दुसरे आमच्या हेही लक्षात आले की आमचे तीन एकर शेतीचे क्षेत्र हे निर्यात करणाऱ्या देशातील हजारो एकराच्या शेतीच्या तुलनेने नगण्य आहे. आयातीत स्वस्त शेतमालाने बाजार भरून होता व आम्ही सतत पिके बदलून टिकून राहण्याचा प्रयत्न करीत होतो. पण आम्ही जे पिकवायचे तेच दुसरे शेतकरीही पिकवायचे व बाजारात कोंडी व्हायची.

कोरिया सरकारच्या शेतकरी धोरणाने शेतीची उत्पादकता वाढली - उत्पादन वाढले. पण हेही सत्य आहे की वाढीव उत्पादनामुळे बाजारात पुरवठा वाढला व आयातीमुळे पडणारा भाव आणखी कोसळला. अशा परिस्थितीत आम्हाला उत्पादन खर्चापेक्षा जास्त किंमत कधी मिळाली नाही. कधी कधी तर बाजारातील किंमती ७५ टक्के कमी झाल्या. पगारदारांचे पगार ५० टक्के कमी करण्यात आले. तर पगारदारांची प्रतिक्रिया काय असणार? कोरियातील ज्या शेतकऱ्यांनी शेती सोडली ते शहरातील झोपडपट्टीत राहू लागले. जे शेतीत राहून कष्ट करीत राहिले ते अखेर वाढत्या कर्जामुळे दिवाळखोर झाले. काही नशीबवान मंडळी जगण्याचा प्रयत्न करीत आहेत पण जास्त काळ ते टिकू शकतील असे मला वाटत नाही. मी अनेकांचे रिकामे शेतीतील घर पाहात आहे. काही मंडळी शहरातून परत आली का ते पाहायला मी त्यांच्या घरात जातो. मागे मी एका शेतकऱ्याने (कर्जबाजारीपणामुळे) विष घेऊन आपले जीवन संपविले होते त्याच्या घरात गेलो. त्या घरात मी फक्त त्याच्या बायकोचा क्षीण आवाज ऐकला. माझ्या जागी तुम्ही असता तर काय केले असते?

मी आमच्या देशातील उत्तर जीऑनला या विभागाच्या स्थानिक विधानसभेत शेतकऱ्यांचे प्रतिनिधित्व केले आहे. या कार्याकाळात मला उपभोक्ता संघाच्या प्रतिनिधींशी चर्चा करण्य़ाची संधी मिळायची. उपभोक्त्यांना चांगल्या प्रतीच्या व सुरक्षित अन्नाची गरज आहे, ते मिळाले तर ते आयात केलेले स्वस्त धान्य नाकारतील. याचे मुख्य कारण त्यांच्या अन्नवरील खर्च त्यांचे एकूण जीवनमानाच्या खर्चाच्या तुलनेत नगण्यच आहे. उदाहरणार्थ, एक प्लेट भाताची (शिजवलेला तांदूळ) कीमत एका च्युईंगमच्या साधारण पॅकेटएवढी किंवा १.७५ एक कप कॉफीएवढीच आहे. म्हणून हॉटेल्स व न्न प्रक्रिया उद्योगांना सोडून उपभोक्त्यांना रासायनिक खते, कीटकनाशके, तणनाशके, जीनेटिक, बियाणेविरहित अन्नाचे आकर्षण वाढत आहे.

माझा सर्व नागरिकांना धोक्याचा इशारा आहे की आज बहुराष्ट्रीय कंपन्या व श्रीमंत देशांच्या दबावात जी जागतिकीकरणाची प्रक्रिया सुरू आहे ही अमानवीय, पर्यावरणाला घातक, शेतकऱ्यांना संपविणारी प्रक्रिया आहे. या प्रकियेला ताबडतोब थांबविले पाहिजे. हे तथाकथित नवीन मुक्त धोरण जागतिक शेतीची विविधता संपवून मानव जातीच्या विध्वंसासाठी कारणीभूत ठरणार आहे. मी अत्यंत विश्वासपूर्वक म्हणतो की, उरुग्वे येथील चर्चा दगाबाज जुगारी राजकारण्यांचा, ज्यांना आपली डोकेदुखी (अतिरिक्त उत्पादन) बहुराष्ट्रीय कंपनीच्या संगनमताने गरीब देशांवर लादायची होती, त्यांचाच नियोजित कट होता.

- विजय जावंधिया